दैनिक
# आरंभ मराठी
21 Sep 2024 - Page 3
epaper.arambhmarathi.com

## विविध वृत्त...

# राजर्षी शाहू महाविद्यालयात सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा उपक्रम



**आरंभ मराठी । उमरगा**

आजच्या युगामध्ये तंत्रज्ञानाच्या वापरामुळे मानवी जीवन सोयीचे झाले आहे. पण हे तंत्रज्ञान काळजीपूर्वक वापरले पाहिजे. या अनुषंगाने राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर व क्विक हिल फाउंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या कार्यक्रमाचे आयोजन लातूर जिल्हा व जवळपासच्या जिल्ह्यामधील शाळा,महाविद्यालय, शासकीय कार्यालय, विविध सामाजिक संस्थेमध्ये केले जात आहे. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील बीसीए व बी.एस्सी., बी.सी.एस. मध्ये शिकत असलेल्या ४० विद्यार्थ्यांची सायबर वॉरियर्स म्हणून निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांनी उमरगा शहरातील शाळेमध्ये व महाविद्यालयामध्ये सायबर सेक्युरिटीचे कार्यक्रम घेतले. उमरगा येथे शाहू महाविद्यालयाची विद्यार्थिनी कुमारी प्रतीक्षा रमेश पांगे हिने उपस्थित सर्व शहरातील लोकांसाठी सायबर सेक्युरिटी बद्दल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे वसंत हंकारे, गणराज गणेश मंडळाचे अध्यक्ष बालाजी पाटील, सर्व पदाधिकारी, उमरगा येथील रहिवाशी उपस्थित होते. उपस्थितांनी राजर्षी शाहू महाविद्यालय आणि क्विक हिल फाउंडेशनचे कौतुक आणि अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.